महाराष्ट्र टाइम्स, गुरुवार, ९ जून, २०११, पृष्ठ क्र. १०

# तीव्र उन्हाळाही यापुढे 'थंड' वाटेल...!

## अमेरिकी शास्त्रज्ञांचा आशिया, आफ्रिकेला इशारा



वॉशिंग्टन

विषुववृत्तीय प्रदेशांना येत्या २० ते ६० वर्षांच्या काळात अत्यंत कडक उन्हाळ्याला सामोरे जावे लागेल, असा इशारा अमेरिकेच्या हवामान शास्त्रज्ञांनी दिला आहे.

स्टॅनफर्ड विद्यापीठाने आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिका या प्रदेशांचा अभ्यास करून काही निष्कर्ष प्रसिद्ध केले आहेत. 'चालू शतकाच्या मध्यावर जगातील मोठे प्रदेश लवकर तापतील. अगदी ५० वर्षांपूर्वीचा कडक उन्हाळाही पुढील काळात थंड वाटेल इतपत उन्हाळा तीव्र झाला असेल,' असे स्टॅनफर्ड विद्यापीठाचे नोहा डिफेनबाग यांनी म्हटले आहे. हवामान बदलाविषयी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जर्नलमध्ये त्यांनी संभाव्य घटनेला 'अकल्पित उन्हाळ्यातील उष्णतेची कायमची आणीबाणी' असे म्हटले आहे.

हवामानाच्या अभ्यासासाठी डिफेनबाग आणि त्यांचे सहकारी मार्टिन स्किअरर यांनी हवामानाच्या ५० मॉडेल प्रयोगांचा अभ्यास केला. तसेच विसाव्या शतकातील हवामानांच्या अंदाजांचाही अभ्यास केला. येत्या ६० वर्षांच्या काळात होणारे हवामानातील बदल हे कदाचित कायमस्वरूपी असतील, अशी शक्यता या अभ्यासातून त्यांनी वर्तविली आहे. आपल्या मुद्याच्या पुष्ट्यर्थ डिफेनबाग यांनी युरोपात २००३ मध्ये आलेल्या उष्णतेच्या लाटेत ४० हजार नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असल्याकडे लक्ष वेधले आहे.

(वृत्तसंस्था)